# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०४/२०१८

**१) शेतातील पोल्टी फार्म मधुन मोबाईल व अनाज साहित्याची चोरी :–**

दिनांक २२/०४/२०१८ चे २३.०० वाजता. दरम्यान यातील अज्ञात चोराने रात्र दरम्यान शेतातील पोल्ट्री फार्म मधील लावलेली जाळी काढुन आत प्रवेश करुन सॅमसंग कंपनीचा जे– ७, १ मॅक्स कंपनीचा मोबाईल, १० किलो गहु, १० किलो तांदुळ, २ किलो कांदे असा एकुण १३,६९०/–रु. चा माल चोरुन नेल्याने, फिर्यादी प्रविण एन. लंजे वय ३५ वर्ष, रा. साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यु व इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २३/०४/२०१८ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी नरेन्द्र शिवशंकर नेवाडे वय २४ वर्ष, रा. निलागोंदी व त्याची मोठी आई रेणुकाबाई मोतीराम भोंडे सह फिर्यादी हा त्याचे मोटार सायकल हिरो होंडा प्लस क्र. एमएच ३६ सी ५४४४६ ने डबल सिट लाखनी मार्गे निलागोंदी जात असता मागेहुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी चालाकने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला मासलमेटा शिवार सालकभाटा येथे मागेहुन धडक मारुन फिर्यादीस जखमी करुन मागे बसलेली रेणुकाबाई हीचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अहवाला वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४,१३४(ब)/ १७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अॅक्टीव्हा गाडी चालकाने भरधाव, वेगाने निष्काळजीपने वाहन चालवुन डिव्हायडरला धडक मारुन दोन जखमी :–**

दिनांक २६/०४/२०१८ चे १६.३० वाजता. दरम्यान यातील आरोपी याने जखमी फिर्यादीस तु माझ्या सोबत फिरायला चल! असे आग्रह करुन फिर्यादीचे अॅक्टीव्हा गाडी क्र. एमएच ३६ टि ६५३६ ची चाबी मागुन जखमी फिर्यादीस मागे बसवुन एनएच ६ रोडने लाखनी वरुन पिंपळगाव सडक कडे जात असता यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन, चालत्या वाहनावर मोबाईवर बोलत असतांनी त्याचे ताब्यातील मोटार सायकल वरचे संतुलन बिघडुन डिव्हायडरला धडक देवुन फिर्यादीस व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी कु. विशाख कुंदन म्हैसगवळी वय २२ वर्ष, रा. मुरमाडी याचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,२५०(अ)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**४) एनडीपीएस अॅक्ट यांची कारवाई :–**

दिनांक २२/०४/२०१८ चे १८.२६ वाजता. दरम्यान यातील मिळुन आलेल्या खबरे वरुन नमुद आरोपीचे घरझडती घेतली असता घरझडती मध्ये अवैद्यरित्या कागदाचे पार्सल मध्ये ५२४ ग्रॅम गांजा स्वयपांक खोलीत असलेल्या लाखडी आलमारीत एका प्लॉस्टीक पन्नी मध्ये पॅकींग केलेल्या एकुण वजन ७४ ग्रॅम गांजा तसेच दरवाजाच्या मागे १ कापडी पिशवीत कागदात बांधलेल्या १२ पुडया गांजाच्या एकुण ११६ ग्रॅम, असा एकुण ७१४ ग्रॅम गांजा ९,०००/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. ऊईके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ८(क),२०(ब)(II), अ एनडीपीएस अॅक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. सोरसे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) महिलेचा मृत्यु:—

दिंनाक २२/०४/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील मृतक रोशनी विजय धोत्रे वय ४६ वर्ष, रा. केशव नगर भंडारा हिला मृत अवस्थेत आकस्मीक विभागात आनले असता, डॉक्टरी मेमो वमृतक जावयाचे बयाना वरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. कन्हाके पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत

६) विहीरीचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु :—

दिंनाक १६/०४/२०१८ चे ०८.०० वा ते दिंनाक २३/०४२२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक मुलगी सौ. वंदना नेहरु मेश्राम वय ४२ वर्ष, रा. चिंगी हिचे डोक्यात फरक असल्याने वेळसरपनाचे भरात ती स्वत: विहीरीचे पाण्यात ऊडी मारुन पाण्यात बुडुन मरण पावलेली आहे. असे फिर्यादी भजन अरुण रंगारी वय ६४ वर्ष, रा. चिंगी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत

७) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :—

दिनांक २३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, पालांदुर, अडयाळ, दिघोरी व भंडारा येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण २० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२५ लिटर हातभंट्टी दारू + ८५० किलो सडवा मोहा २१४० किलो किंमती १,९६,३९०/रु. व ३७ लिटर ८४० मिली लिटर देशी दारु किंमती १०,२७७/—रु. तसेच जुगारातुन १२७४५/रु. असा एकुण किंमती २,१९,४१२/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०२ तीन सिटर वाहनाकरीता— ०६ ईतर वाहनांवरती — ९२ केसेस करण्यात आले आहे.

24.4.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.